Printing Area
UGC
Jr.No.43053
UGC Approved Refereed Journal

ISSN 2394-5303

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका
प्रिंटिंग एरिया™

SPM SCIENCE AND GILANI ARTS COMMERCE COLLEGE
GHATANJI, DIST- YAVATMAL
[Established in 1967 Golden Jubilee Year 2017]

Special Commerce Issue: August 2017

# TRENDS IN COMMERCE, ECONOMICS, MANAGEMENT, IT AND ENVIRONMENT



Chief Editor
Dr.Bapu G.Gholap

Editor
Dr. Naglaxmi N. Tirmanwar

13) A Study of Emerging Issues Influencing International Business of India
**Dr. Ranjana. J. Mahajan, Shri B. D. P. College Pandharkawada,** || 57

14) Study of Aeromycoflora of Gilani College Library
**Dr. Shahezad M.A, and Dr. Ninad Dharkar, Ghatanji** || 60

15) Scope of Tourism in Indian- Atithi Devo Bhava "The world is a book and ....
**Dr.Chetan K.Jiwani, Ghatkopar-Mumbai** || 62

16) Corporatized Retail Business and Consumer Behaviour
**Dr.Naglaxmi NarsingraoTirmanwar, Ghatanji** || 68

17) Brand Euity-A Key of Success
**Dr.RadheshyamChoudhari, Pandharkawda, Dist.Yavatmal** || 72

18) Impact of Goods and Services Tax on the Indian Economy
**Nitin Singhavi, Dhamangaon(Rly.)** || 76

19) Online Banking and E-Commerce-A study
**Dr. Dinesh W Nichit, S.G.M.Mv.Walgaon, Amravati** || 79

20) रोकड विरहीत व्यवहार आणि ग्रामीण अर्थव्यवस्थे समोरील आव्हाने
**प्रा. डॉ. नागोराव के. सोरे, पांढरकवडा** || 82

21) वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) साधक व बाधक चर्चा
**प्रा. प्रकाश एम.वांढरे जि.यवतमाळ** || 85

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
हर्षवर्धन पब्लिकेशन प्रा.लि.
मु.पो.लिंबागणेश, ता.जि.बीड पिन : ४३११२६ (महाराष्ट्र)
harshwardhanpubli@gamil.com, vaidyawarta@gmail.com
सर्व प्रकारच्या शैक्षणिक व संदर्भ ग्रंथाचे प्रकाशक आणि वितरक

www.vidyawarta.com/03 - http://www.printingarea.blogspot.com

याची काळजी घ्यावी. मोबाईल फोन आणि विविध ॲप्सद्वारे आर्थिक व्यवहार करण्याचे ज्ञान ग्रामीण भागातील बऱ्याच लोकांना अवगत नसल्यामुळे अडचण जाणवत आहे. लोकांच्या मजुरीचा मोबदला बँकेत जमा झाला तर त्वरीत काढण्यासाठी पुरेशा प्रमाणात ए.टी.एम. ची सोय ग्रामीण भागात नाही. ग्रामीण भागातील जनतेला कॅशलेस व्यवहार करण्याकरीता माहिती व मार्गदर्शन शिबिरे, उद्बोधन वर्ग, इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करावे. या माध्यमातून सरकारने नागरिकांना विश्वासात घ्यावे. कॅशलेस व्यवहार हा प्रकत आणि अधुनिक अर्थव्यवहाराच्या तुलनेने अधिक सोयीचा असल्याने त्याचा शक्य तितक्या लवकर अवलंब करणे आवश्यक आहे. त्यामुळे काळा पैसा, भ्रष्टाचार आणि गुन्हेगारीला बऱ्याच प्रमाणात आळा घालता येईल.

संदर्भ सूची :


१) भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास - लेखक - डॉ. मुकुंद महाजन (प्रथम आवृत्ती २००१, निराली प्रकाशन, पुणे)

२) अर्थ संवाद : ऑक्टोंबर, डिसेंबर, खंड - ४०, अंक - ३

३) दै. देशोन्नती वृत्तपत्र : ५ फेब्रु. २०१७

४) योजना मासिक

५) दै. लोकसत्ता - २० नोव्हेंबर, २५ नोव्हेंबर २०१६

६) काळापैसा आणि पायाभुत सुविधांचा विकास : लेखक - कृष्णा शहाने,

७) नोटबंदी आणि सरकारची भूमिका : योजना, फेब्रुवारी २०१७


**21**

# वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) साधक व बाधक चर्चा


प्रा. प्रकाश एम.वांढरे

श्री.बाबासाहेब देशमुख पारवेकर

महाविद्यालय पांढरकवडा.जि.यवतमाळ


**********

प्रस्तावना :—

सरकारणे वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) सुरू करण्या विषयी मांडलेले घटनादुरूस्ती विधेयक लोकसभेत संमत झाले. खरेतर भजाप ने सत्तेबाहेर असताना त्याला विरोध केला होता. पण सत्तेवर आल्यावर मात्र या विधेयकाचा आग्रह धरला अप्रत्यक्ष सुधारणाचा भाग म्हणून केळकर समितीने २००३ मध्ये अशा कराची शिफारस केली होती, त्यानंतर २००६ मध्ये युपीए सरकारने जीएसटी विधेयक तयार केले.व २०११ मध्ये ते मांडले होते.१९४७ नतंरचे सर्वात महत्वाचे कर सुधारणा विधेयक म्हणून वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) विधेयक महत्व आहे जी एस टी साठी मोदी सरकार आग्रही होते पण कॉग्रेस च्या विरोधा मुळे ते विधेयक रखडले होते.राज्यसभेत २०३ मतानी हे विधेयक मंजूर झाले. या विधयकाला मंजूरी मिळाल्यामुळे सपुर्ण देशात एकच कर पद्धती लागू होणार आहे. संसदेच्या मान्यते नंतर २९ राज्यापैकी अर्ध्या राज्याची मंजूरी मिळाली आणि अंमलबजावणिचा मार्ग मोकळा झाला आहे अर्था अर्ध्यापेक्षा जास्त राज्ये जीएसटी ला मंजूरी देतील ह स्पष्ट असल्यामुळे हा मुद्दा आडकाठी ठरणार नाही.

तंज्ञाचा अंदाज आहे जीएसटी विधेयकामुळे वस्तू आणि सेवाच्या सुलभ देवान घेवाणीत पारदर्शकता येणार असून, देशाच्या अर्थव्यवस्थेला

चालना मिळेल . देशाच्या महसुली उत्पन्नात वाढ होणार असून सध्याच्या देशाच्या आर्थिक विकासाचा दर पाच टक्के असून तो १२ टक्के जाण्याची शक्यता आहे.

या विधेयकामुळे केंद्रीय अबकारी कर, राज्याचा मुल्यवर्धित कर ,करमणुक कर ,जकात कर ,प्रवेश कर ,चैनिच्या वस्तूवरील कर, खरेदी कर, हे असणार नाही.त्याऐवजी एकच कर असेल. **वस्तू आणि सेवा कर (जीएसटी)** दारूचा समावश नाही, पेट्रोल व डिझेल या करा अंतर्गत विशिष्ट कालावधीनंतर आनले जाईल.

**वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) म्हणजे काय ?**

वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) अर्थातच वस्तू व सेवा कर हा सपूर्ण देशात लागू केला जाणार असून, व्हॅट व इतर कर रद्द होणार आहे.या कर प्रणाली मुळे कर चुकव्याना चाप बसणार आहे. राज्य.सरकार तसेच सर्वसामान्यांना यामुळे कोणताही त्रास होणर नाही. ही प्रणाली लागू झाल्यानंतर केंद्र व राज्य सरकारला समान वाटा मिळणार आहे. राज्य घटनेत जीएसटी सबंधित सर्व महत्वपुर्ण मुद्यांवर (कराच्या दरा सहीत )निर्णय घेण्याचे सर्वाधिकार जीएसटी परिषदेला आहे. परिषदेच्या निर्णयानुसार सगळया वस्तूवर ५,१२,१८,व २८ टक्के या चार दरापैकी कुठल्याही एकादराने कर आकारला जाईल. या व्यतिरिक्ती काही वस्तू व सेवा अशा असतील, ज्यावर कुठलाही कर नसेल म्हणजेच त्या वस्तू आणि सेवा सुट दिलल्या यादीत असतील. सोने, चांदी तसेच यापासून उत्पादित आभूषणासाठी विशेष दर असेल. निर्यात होणाऱ्या मालावर जो काही देशांतर्गतकर भरला असेल. त्याचा पुर्ण परतावा मिळेल. आयात वंस्तूवर सीमाशुल्का व्यतिरिक्त तेवढयाच प्रमाणात जीएसटी आकारण्यात येईल.

एक देश ,एक बाजार, एक कर म्हणजे जीएसटी या ब्रिद वाक्यातून देशात समानता आणणारी महत्वाची भुमिका बजावणारी जीएसटी कर पद्धती लागू होत आहे.सर्व जगाचे भारतातील जीएसटी कडे लक्ष लागले आहे.थोडेसे मागे वळून बघू यात पुर्वीच्या कर संकलनात एखाद्या मालाची विक्री करतांना विक्री कर आणि सेवेसाठी सेवाकर लागत असे. वस्तूचे उत्पादन शुल्क , केंद्र आणि राज्य शासनाचे अप्रत्यक्ष कराची त्यात भर असे. आता जीएसटी मध्ये याच गोष्टी काढल्या आहेत केवळ वस्तू सेवा / पुरवल्यावर जीएसटी लागणार सर्वात जास्त फायदा उपभेक्त्याला होणार असल्याने अत्यावश्यक सेवा व वस्तू स्वस्त होतील बहुतांशी जीवनआवश्यक गोष्टीवर कर नाहीच.

जीएस टी कर आकारणी नुसार त्याचे चार भाग होतात. cgst : सेन्ट्रल जीएसटी केंद्र सरकारला मिळणारे कर संकलन हेज : स्टेट राज्य जीएसटी राज्य सरकारच्या कर संकलनातील वाटा lgst : इंटरस्टेट जीएसटी :दोन राज्यामध्ये व्यवहार झाल्याने घेतलेला जीएसटी utgst : युनियन टॅरिटरी जीएसटी युनियन टॅरिटरीचा करसंकलनात मिळणारा हिस्सा वस्तू व सेवा पुरवठा करणारी राज्य आणि ज्या राज्यात त्याचा उपभोग घेतला जाणार आहे.त्यावर आधारीत कोणी जीएसटी घ्यायची ते इथे ठरते म्हणजे उपभोक्ता राज्याकडून कर संकलन होणार देणारा आणि घेणारा दोन्ही एकाच राज्यात असल्यास राज्यसरकार कडून cgst+ हेज दोन्ही आकारले जातील. cgst केंद्र सरकारला दिला जाईल. (उदा. पुणे ते नागपुर )ही शहरे एकाच राज्यात आहे. नागपुरने जर तो माल इंदोरला पाठवला तर त्यावर sgst परत घेतला जाणार नाही, परंतू lgst आकारणी होईल आणि केद्राला पाठविली जाईल. त्यावर राज्य सरकार क्रेडिटक्लेम करणार आणि जीएसटी मधिल ही पायरी महत्वाची आहे.

एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पुरवठा केला गेला तर पाठवणारे राज्य काहीही जीएसटी घेणार नाही उपभोक्त्याच्या दुसऱ्या राज्यांत cgst + lgst आकारणी होईल केद्र सरकारला cgst हीस्सा पाठवला जाईल (उदा. पुणे ते भेपाळ आंतर राज्य )इथे मध्यप्रदेश राज्यांना lgst फायदेशीर आहे.परंतू माहाराष्ट्राला काहीही मिळणार नाही त्याचांही विचार वेगळयाप्रकारे केलेला आहे. पुरवठा एखाद्या संघराज्यांना (पुणे ते चंदिगड )असेल तर त्या जीएसटीस त्यानी घेतलेला म्हणून utgst संबोधिले

जाईल. cgst +utgst चंदिगड मध्ये घेतला जाईल. आणि केंद्राचा भाग पाठविला जाईल. यामध्ये खूप बारकावे आहेत सरकारचे उत्पन्न वाढविणरी एका अर्थी देशाची प्रगती करणारी कार्यप्रणाली दारातून आत येत आहे. तिचे स्वागत करू.

**जीएसटी मुळे हे होणार स्वस्त :-**

- देवान घेवाणीवर व्हॅट आणि सर्व्हिस टॅक्स लागणार नाही.
- घर खरेदी करण्यासाठी किवा खरेदी विक्री करण्यासाठी ज्या गोष्टीसाठी व्हॅट आणि सर्व्हिस टॅक्स लागतो जीएसटी लागू झाल्यानंतर हा खर्च कमी होणार आहे.
- हॉटेलींग स्वस्त :— रेस्टॉरटल बिल त्यामुळे कमी होईल , कारण आता वॅट आणि सहा टक्के सर्व्हिस टॅक्स लागतो जीएसटी लागू झाल्यास केवळ एकच टॅक्स लागणार आहे.
- इलेक्ट्रॉनिक वस्तू स्वस्त :— सध्या इलेक्ट्रॉनिक वस्तू वर १२.५ टक्के एक्साईज आणि १४.५ टक्के वॅट लागतो जीएसटी लागू झाल्यानंतर १८ टक्के टॅक्स लागतो.

**या गोष्टी होणार महाग :—** चहा कॉफी डबा बंद प्रॅाडक्ट सर्व्हिसेस मोबाईल / क्रेडिट कार्ड बिल जंम्स आणि ज्वेलरी रेडिमेट गारमेंट सही महाग होऊ शकतात.

**वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) ची ठळक वैशिष्ट्ये :—**

अंमलात आणावयाच्या जीएसटी कायद्याचे धोरण विचारात घेता देशाच्या आर्थिक विकासात वाढ होईल. त्यामुळे शक्य तितक्य लवकर त्याची अमंलबजावणी सुरु होणे आवश्यक आहे. जीएसटी ची ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाने....

**कर दर एकसमान राहील :—**

देशातील सर्व राज्यात करपात्र मालाच्या बाबतीत जीएसटी एकच राहील सध्या प्रत्येक राज्याचा कराचा दर वेगवेगळा असल्याने कर या कारणअर्तगत मालाची विक्री किमंत वेगवेगळी असते ही परीस्थीती नाहीशी होईल. कराचा दर एकसमान असल्याने देशातील सर्व राज्य मिळून एकच बाजारपेठ अस्तित्वात येईल.

**करावर कर नाही :—**

करावर कर लागणार नाही,त्यामुळे मालाची किमंत वाढणार नाही उदा. सध्या उत्पादकाने विक्री बिलात लावलेल्या एक्साईज डयूटीचा पुढे विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याला सेट ऑफ मिळत नाही. त्यामुळे त्याचा विक्री किमंतीत समावेश करुन त्यावर पुढील विक्रीकर वसूल करतो.त्याचप्रमाने मध्यवर्ती विक्रीकराचा सेटऑफ मिळत नाही.जीएसटी पद्धतीत या कराचा सेट ऑफ मिळल. परिणामी जीएसटी करामुळे मालाची विक्री किमंत वाढणार नाही.

**पुष्कळशा कायद्याचा जीएसटीत समावेश होईल:—**

जीएसटी पद्धतीत वेगवेगळया कायद्यांचा समावेश होईल. उदा. सर्व्हिस टॅक्स, व्हॅट ,सेंट्रल सेल्स टॅक्स, सेंट्रल एक्साईज डयूटीचा इ .कायद्यांचा समावेश होईल.त्यामुळे सध्या व्यापाऱ्याला वेगवगळया कायद्याखाली जी वेळखाऊ कार्यवाही करावी लागते. ती करावी लागणार नाही वेगवगळया खात्यातील अधिकाऱ्यांना कामासाठी भेटावे लागते ते थांबेल.

**व्यवसायाचे हस्तांतर:—**

कराचा दर समान असल्याने सर्व राज्यात व्यापारात समानता राहील. सध्या प्रत्येक राज्यात मालाचा दर समान नाही.त्यामुळे ज्या राज्यत कराचा दर कमी आहे. त्या राज्यात धंद्याचे मुळ व्यवसाय स्थानांतर करण्याची व्यापाऱ्याची मनोवश्ती होते. काही प्रकरणत कर दरात फरक असल्याने धंद्याचे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतर होते.जीएसटी मुळे कराचा दर सर्व देशात समान असल्याने ही प्रवश्ती नाहीशी होण्यास बळ मिळते.

**करदरात वाढ करण्याचा अधिकार :—**

राज्यांना करदरात वाढ करण्याचा अधिकार राहणार नाही. त्यामुळे सर्व राज्यात करदरात समानता राहील. सध्या प्रत्येक राज्य आपआपल्या राज्यात करदरात वाढ किवा घट करीत असते उदा. आपल्या jkT; k Aerated and carbonated non-alcoholic beverage वर विक्रीकराचा दर २०

ठ आहे. तथापी ,पंजाब राज्यात या मालावर ०१. १०. २०१४ पासून विक्रीकराचा दर २७.५ करण्यात आला आहे. राज्य सरकार मालाच्या कर दरात अध ून—मधून जो बदल करत असते, त्यामुळे राज्यामध ये व्यापारावर परिणाम होतो. ही पद्धत जीएसटी मध ये नाहीशी होईल.

**मुल्यवश्द्धीवर जीएसटी भरावा लागेल :—**

कर भरण्यास पात्र प्रत्येक व्यापाऱ्यास मग तो उत्पादक असो किवा फेरविक्रेता असो त्यास करपात्र मालाच्या पुरवठयावर जीएसटी भरावा लागेल. आणि त्याच्या खरेदीवर भरलेला जीएसटी चा सेटऑफ (in put credit) मिळेल. पुरवठा साखळीमध्ये अखेरच्या व्यापाऱ्याने जो जीएसटी लावलेला आहे. तो ग्राहकाला सोसावा लागेल.

**सी फार्म मिळविण्यात अडचण दूर होणार :—**

मध्यवर्ती विक्रीकर रद्द होईल. त्यामुळे सध या विक्री करणाऱ्या व्यापाऱ्याला परप्रातातील व्यापाऱ्याकडून सी फार्म मिळविण्यामध्ये जी अडचण येते ती नाहीशी होईल.

**उत्पादक आणि व्यावसायिक खर्च कमी होईल :—**

जीएसटी मध्ये निरनिराळया कायद्याचा एका ठिकाणी समावेश केल्याने वेगवेगळया कायद्यातील तरतूदी प्रमाणे होणरा खर्च वाचेल, त्यामुळे उत्पादनाची किमंत कमी होण्यास मदत मिळेल. उत्पादनात वश्द्धी होऊन देशाचा आर्थिक विकास दर वाढेल , परिणामी रोजगारात वाढ होईल.

**सारांश:व्हॅट आणि जीएसटी मधील फरक :—**

**समानता** :— व्हॅट प्रमाणेच जीएसटी मध येही मुल्यवश्द्धीवर कर भरावा लागेल.

**असमानता** :— १) व्हॅट मध्ये सर्व राज्यात कराचा दर समान नाही जीएसटी मध्ये सर्व राज्यात कराचा दर समान राहील.

२) व्हॅट मध्ये वर उल्लेख केल्या प्रमाने करावर कर भरावा लागतो.जीएसटी मध्ये करावर कर भरावा लागणार नाही.

३) व्हॅट मध्ये मध्यवर्ती विक्रीकर भरावा लागतो. जीएसटी मध्ये मध्यवर्ती विक्रीकर रद्द होईल.

4) cgst आणि sgst मध्ये पुष्कळ कराचा समावेश होईल. सध्या पुष्कळ कामासाठी वगवेगळया कायदे आहेत

५) व्हॅट मध्ये व्हॅट कायद्या खालील भरलेल्या कराचाच सेट ऑफ मिळतो अन्य कायद्या खालील कराचा सेट ऑफ मिळत नाही जीएसटी मध्ये पुष्कळ कायद्याचा एकाच ठिकानी समावेश केल्याने सर्व कराचा सेट ऑफ मिळेल.

**/ /जीएसटी लागू होण्यापुर्वी/ /**

**उत्पादक स्तरावर :—**

- एक उद्योजक १००० रू चा माल खरेदी करतो
- यामध्ये १०० रू प्रत्यक्ष कराचा समावेश आहे
- यामध्ये या कच्चा मालावर प्रक्रिया करून ३००रू खर्च करून वस्तू उत्पादन करतो
- तयार झालेल्या मालाचे किमंत निर्धारित करतो १३००रू
- त्यावर १० टक्के कर लागतो
- तयार वस्तू वर किमत १३००रू वर १० टक्के कर
- तयार वस्तू किमत होईल १३०_१३०=१४३०

**ठोक विक्रेता स्तरावर :—**

- उत्पादका पासून ठोक विक्रत्याने वस्तू खरेदी केल्यास त्याला १४३० रू दयावे लागेल
- त्यावर त्याने आपला नफा २०० अधिक केल्यास वस्तूची किमंत १६३० रू होते.
- यावर लागतो १०टक्के कर १६३
- कर जोडल्या नंतर किमत १७९३ रू होते.

**किरकोळ व्यापारी स्तरावर :—**

- ठोक व्यापारी हा किरकोळ व्यापाऱ्यास वस्तू १७९३ रू विकेल
- किरकोळ व्यापारी हा १०० नफा अधिक करून वस्तू किमत १८९३ रू होईल.
- यावर १० टक्के कर लावून १८९३ च्या १० टक्के १८९.३० होईल.

**सध्याच्या (वर्तमान काळात)एकून कर खालील प्रमाने :—**

- वस्तू उत्पादक ,ठोक व्यापारी व किरकोळ व्यापारी यावर एकून सध्याचा कर १००+१३०+१६३+१८९.३०=५८२.३० होईल.
- उत्पादीत वस्तू किमंत १५००+५८२.३०=२०८२.३०

//जीएसटी लागू झाल्यानंतर//

**उत्पादक स्तरावर :—**

- एक उद्योजक १००० रू चा माल खरेदी करतो
- **यामध्ये** १०० रू अप्रत्यक्ष कराचा समावेश आहे
- यामध्ये या कच्चा मालावर प्रक्रिया करून ३००रू खर्च करून वस्तूचे उत्पादन करतो
- तयार झालेल्या मालाचे किमंत निर्धारित करतो १३००रू
- त्यावर १० टक्के कर लागतो
- तयार वस्तू वर किमत १३००रू वर १० टक्के कर १३० रू
- कच्चा माल खरेदी करतेवेळी १००रू चा पुर्विच दिलेला आहे
- शेवटी त्याला फक्त १३०—१००=३० रू कर द्यावा लागेल

**ठोक विक्रेता स्तरावर :—**

- उत्पादका पासून ठोक विक्रत्याने वस्तू खरेदी केल्यास त्याला १३०० रू दयावे लागेल
- त्यावर त्याने आपला नफा २०० अधिक केल्यास वस्तूची किमंत १५००रू होते.
- यावर लागतो १०टक्के कर १५०
- निर्मात्याने यावर १३०रू कर आधिच दिला आहे.ठोक विक्रेत्याला निर्मात्याने चुकविलेल्या सुट मिळणार आहे.त्याला केवळ १५०—१३० = २० रू जीएसटी साठी कर द्यावा लागेल.

**किरकोळ व्यापारी स्तरावर :—**

- ठोक व्यापारी हा किरकोळ व्यापाऱ्यास वस्तू १५०० रू विकेल
- किरकोळ व्यापारी हा १०० नफा अधिक करून वस्तूची किमत १६०० रू होईल.
- यावर १० टक्के कर लावून १६०० च्या १० टक्के १६० होईल. ठोक व्यापाऱ्याने १५०रू पर्यत कर चुकता केलेला आहे किरकोळ व्यापाऱ्यास यावर केवळ १६०—१५०=१० रू जीएसटी च्य रूपात कर द्यावा लागेल.

**जीएसटी मध्ये एकून कर :—**

- वस्तू उत्पादक ,ठोक व्यापारी व किरकोळ व्यापारी यावर एकून जीएसटी कर १००+३०+२०+१०=१६० होईल
- शेवटी उत्पादित केलेल्या वस्तूची एकून किमंत १६६० रू होईल

वरील उदाहरणावरून हे स्पष्ट होत की वस्तूच्या किमंती स्वस्त होणार आहेत व प्रशासना मध्ये पारदर्शता येणार आहे.

**निष्कर्ष व सुचना:—**

सुख आणि शांन्ती साठी जीएसटी हा महान विचार आहे जीएसटी चा जीवना आवश्यक औषध ांच्या दरावर परिणाम होणार नाही. जीएसटी मुळे कर प्रणालीतील क्लिष्टता संपली आहे.सर्व राजकिय पक्षाने मान्यता दिल्याने ह देशाच्या परीपक्व लोकशाहीचे प्रतिक आहे. ही कर प्रणाली हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, त्यामुळे ती अतिशय सुलभ आणि सरळ असली पाहीजे. त्यामुळेच जीएसटी ची यशस्वी अंमलबजावणी होईल.यामुळे नवा इतिहास रचला जाईल.एक राष्ट्र एक कर ही जीएसटीची संकल्पना आहे.त्यामुळे देशात सुसूत्रता निर्माण होईल.

**संदर्भ ग्रंथ सुची:**


१) व्यापार मित्र आक्टो—नव्हें २०१५

२) दै. देशोन्नती २जुलै २०१७

३) संपादकीय लेख दै. देशान्नती १३ जुलै २०१७

४) दै. देशोन्नती ३० जुन २०१७

५) दै.सकाळ २० जुन २०१७

५) गुगल सर्च